**रे.के.नं. २९/२०२५**
**नि.क्र. २५ /क**

अभियोगपक्षातर्फे **साक्षीदार क्र. १** याची जबानी

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करते की,

| | | |
|---|---|---|
| माझे नाव | - | पियुषकुमार व्दीवेदी. |
| वय | - | ४२ वर्षे |
| व्यवसाय | - | नोकरी, |
| राहणार | - | सोनालेगाव, भिवंडी, मुंबई. |

<u>सरतपासणी अभियोगपक्षातर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता पी. बी. देशमाने यांच्याद्वारे</u>

१. मला पुरावाकामी येणेकरीता न्यायालयाचे समन्स प्राप्त झाले. मी दिनांक २७.०२.२०२४ रोजी दुपारी १२.१५ वाजताचे सुमारास पनवेल येथे असताना मला विक्रांत सिंह यांचा फोन आला. त्याने मला आमचा कंटेनर एस.एम.ई यार्ड येथे कट होत असल्याचे सांगितले. त्यामुळे मी दुपारी ०१.००ते ०१.३० वाजताच्या सुमारास तेथे पोहोचलो. त्याआधी मी माझा कर्मचारी योगेश ठाकुर याचेसोबत फोनवर चर्चा केली होती. त्यामुळे त्याने तेथे जाऊन खात्री करून घेण्याचा प्रयत्न केला असता त्याला एसएमई यार्डच्या कर्मचाऱ्यांनी आत जाऊ दिले नाही. मी तेथे पोहोचल्यावर ११२ क्रमांकावर फोन केला. योगेश ठाकुर सोबत त्यावेळी आणखी मोहोम्मद जुनेद सुलतान व त्याचा मुलगा होता. मी फोन केल्याने तेथे पोलीस आले. मी पोलीसांसोबत आतमध्ये गेलो असता कंटेनर कट करून ट्रक मध्ये लोड करत असताना आम्हाला दिसून आले. त्या ट्रक चा क्रमांक एम-एच-४०-वाय-२६२५ असा होता. पोलीसांनी त्या ट्रक व कंटेनरला ताब्यात घेतले. तसेच कटींग करण्यासाठी असलेले सिलेंडर व इतर सामान सुद्धा पोलीसांनी ताब्यात घेतले. तो कट झालेला कंटेनर ट्रान्ससेफ सर्विस

लिमीटेड या माझ्या कंपनीचा होता. अर्धा कंटेनर कट करून ट्रकमध्ये भरलेला होता व अर्धा कंटेनर तेथे खाली होता. त्यानंतर मी आमच्या हेड ऑफिसला फोन करून कंटेनरचा क्रमांक मागुन घेतला. तो क्रमांक पडताळुन पाहिला असता जुळून आला. तेथे एकुण ७ कंटेनर कट केलेले होते. त्यानंतर मी तेथुन पोलीसांसोबत पोलीस ठाण्यात गेलो. त्यानंतर ०१.०३.२०२४ रोजी गुन्ह्याची नोंद करण्यात आली होती. तो गुन्हा सुरेंद्र सिंग याचे विरूद्ध नोंद करण्यात आला होता. आज आरोपी सुरेंद्र सिंग व इतर न्यायालयात हजर आहेत. त्यानंतर ०४.०३.२०२४ रोजी माझा जबाब पोलीसांनी नोंद केला. आता मला तो जबाब दाखवला. त्यावर माझी सही आहे. तो जबाब मराठीमध्ये लिहिला असुन मला हिंदीमध्ये समजावुन सांगितला होता.त्यातील मजकुर बरोबर आहे करीता सदर जबाबास **निशाणी क्र. P1 PW 1** देण्यात येतो. आता मला प्रथम खबर दाखवली. त्यावर माझी सही आहे. करीता प्रथम खबरीस **निशाणी क्र. P2 PW1** देण्यात येतो.

## <u>उलटतपास आरोपीतर्फे वकिल श्री. अनुराग ठाकुर यांच्यामार्फत</u>

२. माझे शिक्षण एम. ए. एल. एल. बी. एवढे झाले आहे. मी ओम लॉजिस्टीक्स येथे लॉ ऑफिसर म्हणुन कार्यरत आहे. ट्रान्ससेफ सर्विसेस ही कंटेनर बनवण्याची व भाड्याने देण्याचे काम करते. ट्रान्ससेफ सर्विसेस ही ओम लॉजिस्टीक्स अंतर्गत ची कंपनी आहे. त्या दोन कंपन्या एकमेकांमध्ये मर्ज झालेल्या नाहीत. ती कंपनी ओम लॉजिस्टीक यांनी कलकत्ता हायकोर्टाच्या आदेशानुसार निलामी मध्ये विकत घेतली आहे. पोलीसांनी त्या संबंधीचा दस्त मागितला नसल्याने मी तो पोलीसांना दिला नाही. ओम लॉजिस्टीक यांचेकडे कंटेनर नाहीत. ट्रान्ससेफ सर्विसेस या कंपनीकडे अंदाजे ३ ते ४ हजार कंटेनर आहेत. ते कंपनी खरेदी केल्यावर त्याचा लोगो बदलला नाही. त्याचे कारण कंपनीचे मालक सांगू शकतात. कंटेनरला देण्यात येणारा क्रमांक हा शासनाकडून दिला जातो. त्या संबंधीचा दस्त असतो. हे म्हणणे खरे

आहे की, त्या दस्ताआधारे कंटेनर हा कोणत्या कंपनीचा आहे ते सांगितले जाऊ शकते. त्या कंटेनर संबंधीचे शासनाचे दस्त पोलीसांनी मागितले नाही त्यामुळे मी पोलीसांना ते दिले नाही. हे म्हणणे खरे नाही की, ते कंटेनर आमचे कंपनीचे असल्याचा कोणताही दस्त मी पोलीसांना दिला नाही. तेथे कट करण्यात आलेल्या कंटनेरचा क्रमांक आय एल सी यु ५०४६४६ असा होता. तो क्रमांक कंटेनरच्या मागच्या बाजूला लिहिलेला असतो. आमच्या कंपनीने आरोपींना कंटेनर दिलेले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, आमच्या कंपनीने आरोपींना ते कंटेनर मेंटेनन्स करण्याकरीता दिले होते. जेएस कंटेनर यार्ड कोणाचे आहे याची मला माहिती नाही. जेएस कंटेनर यार्ड व एसएम कंटेनर हे दोन्ही एकाच मालकाचे आहेत. जेएस कंटेनर यार्ड यांना आमच्या कंपनीने ते कंटेनर भाड्याने दिले होते. त्या कंटेनरच्या देखरेखीचे काम जेएस कंटेनर यांचेच होते. हे म्हणणे खरे आहे की, कंटेनरच्या दुरूस्तीचे काम सुद्धा जेएस कंटेनर यांचेच होते. हे म्हणणे खरे नाही की, कंटेनर कोठे खराब झालेले होते याबाबत माझे जबाबात नमुद केलेले नाही. हे म्हणणे खरे आहे की, त्या कंटेनरच्या दुरूस्तीची जबाबदारी जेएस कंटेनरची असल्याने कंटेनर कुठे खराब झाले हे पाहण्याचे काम आमचे नव्हते. हे मला माहित नाही की, एसएमई कंटेनर सुद्धा कंटेनरच्या दुरूस्तीचे काम करतो. हे म्हणणे खरे नाही की, ते कंटेनर कोणत्या भागाने कट केलेले होते ते मला सांगता येत नाही. हे मला माहित नाही की, कंटेनरच्या मेंटेनन्स चे काम एसएमई कंटेनर यार्ड येथे होते. हे म्हणणे खरे आहे की, तेथे इतरही कंपनीचे कंटेनर होते.

प्रश्न : कंटेनरचा कोणता भाग कट केला होता ते तुम्हाला सांगता येत नाही!

उत्तर : पुर्ण कंटेनरच कट केले होते.

३. हे म्हणणे खरे आहे की, मला माहिती दिनांक २७.०२.२०२४ रोजी मिळाली होती. हे म्हणणे खरे आहे की, मला कंटेनर संबंधीची माहिती विक्रांत सिंग व योगेश ठाकुर यांचेकडुन मिळाली होती. हे म्हणणे खरे आहे की, दिनांक

२७.०२.२०२४ रोजी मी पोलीस ठाण्यात कोणतीही तक्रार दिली नाही. हे म्हणणे खरे आहे की, तक्रार दाखल करण्यास उशीर झाल्याचे कारण फिर्यादमध्ये नमुद नाही. दिनांक ०४.०३.२०२४ रोजी पोलीसांनी मला जबाब घेण्याकरीता बोलवले होते. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक ०१.०३.२०२४ रोजी तक्रार देताना राहिलेले दोष काढुन टाकण्याकरीता मी ०४.०३.२०२४ रोजी पुन्हा जबाब देण्यासाठी गेलो. दिनांक २७.०२.२०२४ रोजी ट्रक कंटेनर व इतर वस्तु ताब्यात घेतल्याचा पंचनामा पोलीसांनी माझे समक्ष केला नाही. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक २७.०२.२०२४ रोजी पोलीसांनी माझे समक्ष कोणतीही वस्तु ताब्यात घेतली नाही. हे म्हणणे खरे नाही की, केवळ नुकसान भरपाई मिळावी म्हणुन ७-८ कंटेनर कट केल्याचे मिळाल्याचे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे आहे की, मी त्या सर्व कंटेनरचे क्रमांक सांगु शकत नाही. हे म्हणणे खरे नाही की, ते कंटेनर आमच्या कंपनीच्या मालकीचे असल्याचे कोणतेही कागदपत्र मी पोलीसांना दिले नाही. हे म्हणणे खरे नाही की, तेथे मिळुन आलेले कंटेनर आमच्या कंपनीचे नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, केवळ पैसे मिळण्यासाठी मी खोटी फिर्याद दाखल केली. हे म्हणणे खरे नाही की, मी सरतपासातील मजकूर खोटा सांगितला आहे.

उलटतपास पुर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्विकृत

**सही/-**

**उरण,** **(एस.पी. वानखडे )**

**दिनांक – ०७/०५/२०२६** **न्यायदंडाधिकारी प्र. वर्ग,न्यायालय क्र.१ उरण**